**महिला व बालकल्याण विभाग**
**जिल्हा परिषद,अमरावती**
**जिल्हा न्यायालयासमोर,कॅम्प अमरावती पिन-४४४६०१**
E-mail-dyceobalkalyan@gmail.com **दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६१९३४**

**जा.क्र.जिप /मबाक/ मक / १०२ /२०१६** **दिनांक:- २० एप्रील २०१६**

## महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती सभा दिनांक ०१/०४/२०१६ चे कार्यवृत्त
## भाग-१.

आज दिनांक ०१/०४/२०१६ रोजी महिला व बालकल्याण समितीची सभा मा.सभापती, महिला व बाल कल्याण समिती जि.प. अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली सभापती म.बा.क.समिती यांचे कक्षात दुपारी १.०० वाजता सुरु झाली.

**आजच्या सभेला महिला व बालकल्याण समितीचे खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | सन्मा.श्रीमती वृषालीताई प्रकाशराव विद्ये | सभापती |
| २ | सन्मा. श्रीमती विद्याताई संजयराव तटटे | सदस्या |
| ३ | सन्मा. श्रीमती गिताताई संतोषराव चव्हाण | सदस्या |
| ४ | सन्मा. श्रीमती रंजनाताई बाबुरावजी उईके | सदस्या |
| ५ | सन्मा. श्रीमती संगीताताई प्रेमदास चक्रे | सदस्या |
| ६ | सन्मा.श्रीमती संगीताताई प्रविणराव सवाई | सदस्या |
| ७ | सन्मा.श्रीमती पद्माताई अंबादास पंचाळे | सदस्या |
| ८ | श्री कैलास एन.घोडके | सदस्य,सचिव |

आजची सभा मा. सभापती, महिला व बाल कल्याण समिती ,यांच्या निर्देशानुसार विषय पत्रिकेतील विषयाप्रमाणे सभेचे कामकाज करण्यांत आले.

**विषय क्रमांक १ :- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर करणे.**

मागील सभा दिनांक १/०३/२०१६ चे कार्यवृत्त श्री. कैलास एन.घोडके , उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) तथा सचिव ,महिला व बालकल्याण समिती यांनी सभेपुढे वाचुन दाखविले. त्यावर साधक बाधक चर्चा होवुन कार्यवृत्त सर्वानुमते मंजुर करण्यांत आले.

**विषय क्रमांक २ :- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**विषय क्रमांक ३ :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनाचा आढावा घेणे.**

आजच्या सभेला उपस्थित असलेले बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी सेविका भरतीबाबत ,तसेच अंगणवाडी इमारत बांधकामाबाबतचा आढावा घेण्यांत आला.तसेच सन २०११-१२ , सन २०१२-१३ व सन२०१३-१४ मधील अजुनपर्यंत पुर्ण न झालेली अंगणवाडी इमारत बांधकामे त्वरीत पुर्ण करण्याबाबत सुचना दिल्यात. ज्या ठिकाणी अंगणवाडी केंद्राकरीता जागा उपलब्ध नाही त्या ठिकाणी तहसिलदार यांचेशी संपर्क करुन जागा प्राप्त करण्याबाबत सर्व बा.वि.प्र.अ.यांना सभेमध्ये सुचीत करण्यांत आले. तसेच प्रकल्पनिहाय अंगणवाडी पोषण आहार आरोग्य तपासणी ग्रेड-३ व ग्रेड-४ ची मुले, बालमृत्यू ,लसीकरण व कूटूंबकल्याण इत्यादी बाबतचा प्रगती अहवाल सभेपुढे वाचुन दाखवला .त्यावर सभेत उपयुक्त सूचना देवून समितीने समाधान व्यक्त केले.

**मा.सभापती यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**विषय क्रमांक ४ :- जिल्हा निधी १०% सेसफंडामध्ये शासकीय निधी सन २०१६-१७ करीता प्राप्त झालेला निधी शासन निर्णय दिनांक १०.३.२०११ चे निर्देशानुसार विविध योजनेवर वळती करणे.**

सन २०१६- २०१७ मध्ये जिल्हानिधी चे मुळ अंदाजपत्रकामध्ये महिला व बाल कल्याण समितीला योजना राबविण्याकरीता अनुदान देण्यांत आलेले आहे. परंतु शासन निर्णय दिनांक १०.३.२०११ व शासन शुध्दीपत्रक दि.२२.७.२०११ नुसार एकुण निधी पैकी ५०% निधी वस्तु व साहीत्य खरेदीवर तसेच ५०%निधी प्रशिक्षणावरील योजनांसाठी खर्च करण्याबाबत आदेशित आहे. तसेच शासन शुध्दीपत्रक दिनांक १६ जुन २०१२ नुसार प्रशिक्षणावरील ५०% निधी पैकी योजना क्र.१ वर २०% निधी खर्च करण्याबाबत नमुद केलेले आहे. त्यामुळे वरील शासन निर्णयानुसार महिला व बाल कल्याण समितीने जिल्हानिधीचे मुळ अंदाजपत्रकातील अनुदान खालील योजनेवर वळती केलेले आहे.

| अ. क्रं | योजनेचे नांव | सन २०१६-१७ मध्ये योजने वरील मुळ तरतुद | शासन निर्णय दि.१०.३.११ / शासन शुध्दीपत्रक दि.२२.७.११ /शासन शुध्दीपत्रक दि.१६.६.१२ मधील निर्देशानुसार सन २०१६-१७ मध्ये निधी वळती करुन घेतलेल्या योजना व त्यावर दिलेले अनुदान |
|---|---|---|---|
| १. | १०१-A२१ग्रामीण भागातील महिलांना साहित्य पुरविणे अंतर्गत ९० टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरविणे | ३०,००,०००/- | २३,८०,०००/- |
| २ | १०१ A०५ महिलासाठी समुपदेशन केंद्र चालविणे | २,००,०००/- | ३,००,०००/- |
| ३ | (इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत शिकणा-या) मुलींसाठी मोफत सायकली पुरविणे. | १५,००,०००/- | १५,००,०००/- |
| ४ | १०१C५० जागतिक महिला दिन | ६०,०००/- | ८१,०००/- |
| ५ | सातवी व बारावी वी पांस ग्रामिण मुलींना/महिलांना संगणक | १०००/- | १७,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रशिक्षण देणे. | | |
| ६ | १०१-A ३४मुलीनां महिलानां व्यासायिक तांत्रिक प्रशिक्षण देणे | २०,००,०००/- | १७,००,०००/- |
| ७ | १०१-११ सन्मा.महिला पदाधिकारी / सदस्य यांचा अभ्यास दौरा | १०,००,०००/- | १,००,०००/-(प्रलंबित अग्रीमाचे समायोजन) |
| | **एकुण** | **७७,६१,०००/-** | **७७,६१,०००/-** |

करीता वरील प्रमाणे जिल्हानिधी मधील निधी वळती करुन घेतलेल्या योजनेस व त्यावरील अनुदानास मंजुरी देण्यात आली.

तसेच म.बा.क.समितीने शासकीय निधी अनुसुचित जाती व अनुसुचीत जमाती अंतर्गत प्राप्त अनुदानामधुन खालील योजना घेतलेल्या असुन अटि व शर्ती निश्चित केलेल्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | **अनुसुचीत जाती करीता अनुदान**<br>ग्रामीण भागातील महिलांना साहित्य पुरविणे अंतर्गत ९० टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरविणे | १५,००,००० |
| २ | इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत शिकणा-या ग्रामीण मुलीसाठी मोफत सायकल पुरविणे | १०,००,००० |
| ३ | सातवी व बारावी वी पांस ग्रामिण मुलींना/महिलांना संगणक प्रशिक्षण देणे. | १५,००,००० |
| ४ | मुलींना व महिलांना व्यावसायीक व तांत्रीक प्रशिक्षण देणे | १०,००,००० |
| | | **एकुण - ५०,००,०००/-** |
| १. | **अनुसुचीत जमाती करीता अनुदान**<br>ग्रामीण भागातील महिलांना साहित्य पुरविणे अंतर्गत ९० टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरविणे | ११,००,००० |
| २ | इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत शिकणा-या ग्रामीण मुलीसाठी मोफत सायकल पुरविणे | १०,००,००० |
| ३. | दहावी व बारावी वी पांस ग्रामिण मुलींना/महिलांना संगणक प्रशिक्षण देणे. | १०,००,००० |
| ४. | मुलींना व महिलांना व्यावसायीक व तांत्रीक प्रशिक्षण देणे | ११,१२,००० |
| | | **एकुण - ४२,१२,०००/-** |

तसेच वरील योजनेला महीला व बाल कल्याण समिती सभेमध्ये साधक-बाधक चर्चा होवुन ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला व उपरोक्त योजनेला प्रशासकीय मंजुरी व निकष व अटीना मंजुरी देण्याबाबत तसेच महाराष्ट्र जि.प.व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १२८ अन्वये मालमत्ता संपादन करणे तथा खरेदीस मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव जि.प.सर्वसाधारण सभेत सादर करण्याबाबत म.बा.क.समितीने शिफारस केली आहे.

**विषय क्रमांक ५ :- सन २०१५-१६ मधील शिवणकाम व फॅशन डिझाईन तसेच संगणक CCC/MS-CIT या योजनेवरील अखर्चीत निधी सन २०१६-१७ मध्ये खर्च करण्याची परवानगी मिळण्याबाबत.**

सन २०१५-१६ मध्ये शिवणकाम व ड्रेस फॅशन डिझायनिगं प्रशिक्षणाकरीता अनुसुचित जाती करीता अनुदान रु. ५,००,०००/-अनुसुचित जमाती(ST) करीता अनुदान रु. १,००,०००/- असे एकुण ६,००,०००/- अनुदान प्राप्त झाले होते.त्या अनुषंगाने सन २०१५-१६ मध्ये राबविण्यात आलेल्या शिवणकाम व ड्रेस डिझायनिग प्रशिक्षणा करीता अनु.जाती (SC) अनुदानातुन रु.२,४८,४००/-खर्च करण्यात येवुन उर्वरीत रक्कम रुपये **२,५१,६००/-** शिल्लक आहे.तसेच अनु.सुचित जमाती ST अनुदानातुन रु.४८६००/- खर्च झाला असुन **रु.५१४००/-** अनुदान शिल्लक आहे.सदर शिल्लक अनुदानातुन संस्थेचे ५०% देयक देणे बाकी आहे.तसेच संगणक प्रशिक्षण (MS-CIT/CCC) अनुसुचित जाती करीता अनुदान रु. १०,००,०००/-अनुसुचित जमाती करीता अनुदान रु. ४,००,०००/- असे एकुण १४,००,०००/- निधी मधुन सन २०१५-१६ मध्ये संगणक प्रशिक्षणकरीता अनु.जाती SC मधुन रु.४,९८,८००/- खर्च झाला असुन उर्वरीत रक्कम रु.५,०१२००/- शिल्लक आहे.व अनु.जमाती ST अनुदानातुन रु.१९७२००/- खर्च झाला असुन उर्वरीत रककम रु.२०२८००/- शिल्लक आहे. सदर शिल्लक अनुदानातुन संस्थेचे ५०% देयक देणे बाकी आहे.

करीता शिवणकाम व फॅशन डिझाईन प्रशिक्षणा वरील अखर्चीत निधी शासकीय अनु.जाती रु. **२,५१,६००/-** शासकीय अनु.जमाती **रु.५१४००/-** तसेच सन २०१५-१६ मधील संगणक प्रशिक्षणा वरील अखर्चीत निधी शासकीय अनु.जाती रु.**५,०१२००/-** शासकीय अनु.जमाती **रु.२,०२८००/-**सन २०१६-१७ या वर्षा मध्ये खर्च करण्यात यावा . असा ठराव महिला व बाल कल्याण समिती मध्ये सर्वानुमते मंजुर करण्यात येवुन सदर प्रस्तावास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यांत यावी असे सभेमध्ये ठरले.

**विषय क्रमांक- ६:- सन २०१६-१७ च्या प्राप्त निधी मधुन साधी शिलाई करणारी मशिन व लेडीज सायकल खरेदी करण्याबाबत .**

सन २०१६-१७ च्या प्राप्त तरतुदी मधुन साधी शिलाई मशीन, लेडीज सायकल खरेदी ही ई-निविदा प्रक्रियेव्दारे राबविण्याबाबत समितीने ठरविले.तसेच साधी शिलाई मशीन व लेडीज सायकल ही (colour - **Purple**) खालील आकारमान प्रमाणे खरेदी करण्याबाबत समितीने ठरविले.

**साधी शिलाई मशिन आय.एस.आय.मार्क**

अ) मशीन ही साधी शिलाई, काम करणारी पाहीजे.(पायाने चालविणेकरीता)

ब) हेड आय.एस.आय.मार्क (क) स्टॅन्ड वजन २० किलो किमान (ड) सनमाईका टॉप,ड्राव्हरसहीत १८x३६ इंच, कैची ९ इंची चांगल्या दर्जाची,लेदर राऊंड ब्लेड,मेजर टेप, ऑईल कॅन स्क्रु ड्रायव्हर बॉबीन इत्यादी पुरवठा योग्यवेळेवर होण्याकरीता योग्य अटी शर्ती निविदा प्रक्रिया करताना नमुद करण्यात याव्या.

**लेडीज सायकल (आय.एस.आय.मार्क)**

Bicycle Ladies-with ISI Mark - size standred ५०.८० cms (२०) ladies cycle Completely assembled with pvc saddle (colour - **Purple**)

**विषय क्रमांक - ७:- सन २०१६-२०१७ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सर्वसाधारण योजनेमधून अंगणवाडी इमारत बांधकाम करणेबाबत.**

सन २०१६-२०१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनमध्ये सर्वसाधारण योजनेमध्ये अंगणवाडी इमारत बांधकामे करण्याकरिता रूपये ५,००,००,००० निधी मंजूर केलेला आहे.शासन निर्णय दि.२०.४.२०१२ नुसार प्रती अंगणवाडी इमारत बांधकामाकरीता खर्चाची जास्तीत जास्त मर्यादा रु.६.०० लाख आहे.त्यामुळे रु.५००.०० लाखामध्ये प्रती अंगणवाडी रु.६.०० लाख प्रमाणे एकुण ८३ अंगणवाडी बांधकाम होवु शकतात.करीता प्रत्येक तालुक्यामधुन बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी बांधकाम आवश्यक असलेल्या गांवाची यादी सादर केल्यामुळे सदर प्राप्त यादी मधुन गांवाची निवड करुन ८३ अंगणवाडी बांधकाम प्रस्तावित करण्याबाबत.सभेमध्ये सर्वानुमते यादीला मंजुरात देण्यात येवुन सदर ठरावाला प्रशासकीय मान्यता तसेच मालमत्ता संपादन करण्यास्तव ठराव जि.प.सभेसमोर ठेवण्याबाबत सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक - ८:- सन २०१६-२०१७ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजनेमधून अंगणवाडी इमारत बांधकाम करणेबाबत.**

सन २०१६-२०१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनमध्ये आदिवासी योजनेमध्ये अंगणवाडी इमारत बांधकामे करण्याकरिता रूपये २००.०० लक्ष निधी मंजूर केलेला आहे.त्यामुळे रु.२००.०० लाखामध्ये प्रती अंगणवाडी बांधकाम रु. ६,६०,०००/- प्रमाणे एकुण ३० अंगणवाडी बांधकाम होवु शकतात.करीता धारणी/चिखलदरा तालुक्यामधुन बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी बांधकामाकरीता आवश्यक असलेल्या गांवाची यादी सादर केल्यामुळे सदर प्राप्त यादी मधुन गांवाची निवड करुन ३० अंगणवाडी बांधकाम करणे प्रस्तावित करण्याबाबत.सभेमध्ये सर्वानुमते यादीला मंजुरात देण्यात येवुन सदर ठरावाला प्रशासकीय मान्यता तसेच मालमत्ता संपादन करण्यास्तव ठराव जि.प.सभेसमोर ठेवण्याबाबत सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक-९ :- अंगणवाडी केंद्रांना धान्याकोटी व भांडी उपलब्ध करुन देणे, तसेच मेळघाट भागातील बालकामध्ये असलेले बाल मुत्युचे व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना मायक्रोन्युटीन सप्लीमेंट देणेबाबत.**

सन २०१५-१६ मध्ये मेळघाट भागातील बालकामध्ये असलेले बालमुत्युचे व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना मायक्रोन्युटीएन सप्लीमेंट देणेकरीता रुपये ९४.३६ लक्ष निधी प्राप्त झालेला आहे.सदर निधी मधुन मेळघाट भागातील धारणी व चिखलदरा अंतर्गत असलेल्या अंगणवाडी केंद्राना मायक्रोन्युटीएन सप्लीमेंटचा पुरवठा करुन मेळघाट भागातील बालकामध्ये असलेले बालमुत्युचे व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना आहार देण्यात येवुन बालमृत्यु व कुपोषणाचे प्रमाण कमी करता येण्याचे दृष्टीने सदर योजना राबविण्याबाबत सभेमध्ये सर्वानुमते मंजुरात देण्यात आली.तसेच अंगणवाडी केंद्राना धान्यकोटी व भांडी उपलब्ध करुन देण्याकरीता धारणी तालुक्याकरीता रु.२६,०५५००/- व चिखलदरा तालुक्याकरीता रुपये २५,९२,०००/- असा एकुण ५१,९७,५००/- निधी मंजुर असुन प्रती अंगणवाडी १३,५००/- प्रमाणे धान्यकोटी,भांडी खरेदी करणे प्रस्तावित आहे. सदर योजना राबविण्याबाबत सभेमध्ये सर्वानुमते मंजुरात देण्यात आली.वरील प्रमाणे दोन्ही योजनेला प्रशासकीय मान्यता तसेच मालमत्ता संपादन करण्यास्तव ठराव जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्याबाबत सर्वानुमते ठरले.

विषय पत्रिकेवरील विषय संपल्यामुळे मा.अध्यक्षाचेवतीने सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
**सचिव,तथा**
**उप मुख्यकार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद अमरावती**

स्वा/-
**सभापती,**
**महिला व बालकल्याण समिती,**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**महिला व बालकल्याण विभाग**
**जिल्हा परिषद,अमरावती**
**जिल्हा न्यायालयासमोर,कॅम्प अमरावती पिन-४४४६०१**
E-mail-dyceobalkalyan@gmail.com **दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६१९३४**


जा.क्र.जिप /मबाक/ मक / ९६०/२०१६ दिनांक:- १३ मे २०१६

**महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती सभा दिनांक ३०/०४/२०१६ चे कार्यवृत्त**
**भाग-१.**

आज दिनांक ३०/०४/२०१६ रोजी महिला व बालकल्याण समितीची सभा मा.सभापती, महिला व बाल कल्याण समिती जि.प. अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली सभापती म.बा.क.समिती यांचे कक्षात दुपारी १.०० वाजता सुरु झाली.

**आजच्या सभेला महिला व बालकल्याण समितीचे खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | सन्मा.श्रीमती वृषालीताई प्रकाशराव विद्ये | सभापती |
| ३ | सन्मा. श्रीमती गिताताई संतोषराव चव्हाण | सदस्या |
| ६ | सन्मा.श्रीमती संगीताताई प्रविणराव सवाई | सदस्या |
| ७ | सन्मा.श्रीमती शोभाताई सुखदेवराव इंगोले | सदस्या |
| ८ | श्री कैलास एन.घोडके | सदस्य,सचिव |

आजची सभा मा. सभापती, महिला व बाल कल्याण समिती ,यांच्या निर्देशानुसार विषय पत्रिकेतील विषयाप्रमाणे सभेचे कामकाज करण्यांत आले.

**विषय क्रमांक १ :- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर करणे.**

मागील सभा दिनांक १/०४/२०१६ चे कार्यवृत्त श्री. कैलास एन.घोडके , उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) तथा सचिव ,महिला व बालकल्याण समिती यांनी सभेपुढे वाचुन दाखविले. त्यावर साधक बाधक चर्चा होवुन कार्यवृत्त सर्वानुमते मंजुर करण्यांत आले.

**विषय क्रमांक २ :- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**विषय क्रमांक ३ :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनाचा आढावा घेणे.**

आजच्या सभेला उपस्थित असलेले बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी सेविका भरतीबाबत ,तसेच अंगणवाडी इमारत बांधकामाबाबतचा आढावा घेण्यांत आला.तसेच सन २०११-१२ , सन २०१२-१३ व सन२०१३-१४ मधील अजुनपर्यंत पुर्ण न झालेली अंगणवाडी इमारत बांधकामे त्वरीत पुर्ण करण्याबाबत सुचना दिल्यात. ज्या ठिकाणी अंगणवाडी केंद्राकरीता जागा उपलब्ध नाही त्या ठिकाणी तहसिलदार यांचेशी संपर्क करुन जागा प्राप्त करण्याबाबत सर्व बा.वि.प्र.अ.यांना सभेमध्ये सुचीत करण्यांत आले. तसेच प्रकल्पनिहाय अंगणवाडी पोषण आहार आरोग्य तपासणी ग्रेड-३ व ग्रेड-४ ची मुले, बालमृत्यू ,लसीकरण व कूटूंबकल्याण इत्यादी बाबतचा प्रगती अहवाल सभेपुढे वाचुन दाखवला .त्यावर सभेत उपयुक्त सूचना देवून समितीने समाधान व्यक्त केले.

**विषय क्रमांक-४ लेखा विषयक नोंदवहयाना स्विकृती घेणेबाबत.**

महिला व बाल कल्याण विभागातील लेखविषयक नोदवहया, किरकोळ रोकड वही, घनादेश नोदवही, बिल नोंदवही, खर्च नोंदवही, जंगम मालमत्ता नोंदवही, वाहन लॉगबुक, इतिहास पुस्तिका, स्थायी अग्रीम नोंदवही, दूरध्वनीनोंद वही, जमानत ठेव नोंदवही अश्या प्रकारे १६ लेखा विषयक नोंदवहयाना मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव सभेमध्ये ठेवण्यात आला त्यावर महिला व बाल कल्याण समितीमध्ये साधक बाधक चर्चा होवून सर्वानुमते मंजूरात प्रदान करण्यात आली.

**मा.सभापती यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**विषय क्रमांक -५ :- सन २०१६-१७ मध्ये योजना राबविण्याकरीता लाभार्थी निवडी बाबत सन्मा.सदस्यांना पत्र देण्याबाबत.**

महिला व बाल कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजने करीता लाभार्थी निवडीबाबत सन्मा.सदस्यांना पत्र देवुन लाभार्थी नांवे मागविण्याबाबत सभेमध्ये ठरविण्यात आले तसेच सन्मा.सदस्य/सदस्या यांचे कडुन विहीत मुदतीत लाभार्थी नांवे प्राप्त न झाल्यास सदर वर्षातील लाभार्थी निवड शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी २०१४ च्या मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे करण्याबाबत समितीने मान्यता देवुन ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्रमांक-६ :- सन २०११-१२ मधील संगणक प्रशिक्षणामधील सुरक्षा ठेव रक्कम रुपये २७४४०/- मधुन आयकर वसुल रक्कम रु.१९३८४/- शासन खाती जमा करण्याबाबत कार्येत्तर मंजुरात मिळणेबाबत.**

महिला व बाल कल्याण विभागा मार्फत सन २०११-१२ मध्ये ग्रामीण महिलांना व मुलींना संगणक प्रशिक्षण देणे हि योजना राबविण्यात आली होती.त्या अनुषंगाने सदरचे प्रशिक्षणाचे काम खोडके काम्प्युटर अमरावती यांना देण्यात आले होते.सदर संस्थेने सुरक्षा ठेव रक्कम रु.२७४४०/- जिल्हा निधी ३-ब ठेवी ११ संर्कीण मध्ये जमा करण्यात आली होती.प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर संबंधित संस्थेचे देयक अदा करतांना देयकातुन २.३% आयकर रु.१९३८४/- वसुल करण्यात आला नव्हता.त्यामुळे सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणात सदर आक्षेप अंर्तभुत करण्यात येवुन पंरास लेखापरिक्षण पुर्नविलोकन अहवालात समाविष्ठ करण्यात आला सदरची आयकर रक्कम रुपये १९३८४/- भरणा करण्याबाबत खोडके कॉम्प्युटर अमरावती यांना ३,४ पत्र देवुनही संबंधितांनी रक्कम भरणा केली नाही.करीता या कार्यालयाकडे त्यांची सदर वर्षातील जमा असलेली सुरक्षा ठेव रक्कम रु.२७४४०/-मधुन वसुलपात्र आयकर रक्कम १९३८४/- काढण्यात येवुन सदरची रक्कम शासनखाती जमा करावी लागेल व उर्वरीत रक्कम रुपये ८०५६/- संबंधित संस्थेला अदा करावी लागेल.

परंतु सदरची रक्कम सन २०११-१२ मधील असल्यामुळे सदर रक्कमेला तीन वर्षावरील कालावधी झाला असल्यामुळे सदर देयकाला महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४५ अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल.परंतु सदर वसुल ही पंरास मुद्या संबंधित असल्यामुळे व मंत्रालय स्तरावर मा.सचिवाची साक्ष असल्यामुळे सदर वसुली करुन रक्कम शासन खाती भरणा केल्यास पंरास मुद्या खारीज होवु शकतो.

तदनंतर पुढील होणा-या सर्वसाधारण सभेची कार्येत्तर मंजुरात घ्यावी लागेल करीता सर्वसाधारण सभेची कार्येत्तर मंजुरात घेण्याचे अधिन राहुन सदर देयके पारीत करण्याकरीता लेखा विभागास सादर करावे लागेल.

**ठराव :- सदर विषयावर साधक - बाधक चर्चा होवुन सदर मुद्या पंरास वसुली संदर्भात असल्यामुळे संबंधितांचे सुरक्षा ठेव रक्कम रु.२७४४०/- मधुन रुपये.१९३८४/- आयकर वसुली नियमानुसार शासनखाती जमा करण्यात येवुन सदर देयकाला महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४५ अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्याकरीता पुढील होणा-या सर्वसाधारण सभेची कार्येत्तर मंजुराती करीता सदर विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठेवण्याकरीता सभा सर्वानुमते मंजुरात देत आहे.**

**विषय क्रमांक-७ :- सन २००३-०४ ते सन२०१३-१४ मधील अंगणवाडी केंद्रान आहार वाटपातील कामाधील सुरक्षा ठेव रक्कम रुपये ६०३२०४/- सदर देयकाला महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४५ अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.**

महिला व बाल कल्याण विभागा मार्फत सन २००३-०४ ते २०१३-१४ मध्ये महासंघामार्फत प्रकल्पस्तरावर अंगणवाडी केंद्राना आहार वाटपाचे काम सुरु होते. सदरकामाच्या निविदेमधील अटी व शर्ती नुसार महासंघाने रुपये ६०३२०४/- सुरक्षा ठेव जमा करण्यात आली होती.सदरची सुरक्षा ठेव रक्कम रुपये ६०३२०४/- जिल्हा निधी ३-ब ठेवी ११ संर्कीण मध्ये जमा करण्यात आली होती.

सदर आहार पुरविण्याचे काम महासंघाला सन २०१३-१४ पर्यंतच होते.सदर संस्थेने आहार पुरवठयाचे काम योग्यरित्या पुर्ण करुन त्यांची या कार्यालयाकडे जमा असलेली सुरक्षाठेव रक्कम रुपये ६०३२०४/- त्यांनी परत मागीतलेली आहे.सदरची सुरक्षा ठेव रक्कम ही सन २००३-०४ या वर्षातील असल्यामुळे सदर रक्कमेला तीन वर्षावरील कालावधी झाला असल्यामुळे सदर देयकाला महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४५ अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल.करीता सदर विषय जि.प.सर्वसाधारण सभेत ठेवण्यापुर्वी महिला व बाल कल्याण समिती सभेची मंजुरात घ्यावी लागेल.

**ठराव :- सदर विषयावर साधक - बाधक चर्चा होवुन सदर  देयकाला महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४५ अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुराती करीता सदर विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठेवण्याकरीता सभा सर्वानुमते मंजुरात देत आहे.**

विषय पत्रिकेवरील विषय संपल्यामुळे मा.अध्यक्षाचेवतीने सचिव यांनी  उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर  केले.

स्वा/-

**सचिव,तथा**
**उप मुख्यकार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद अमरावती**

स्वा/-

**सभापती,**
**महिला व बालकल्याण समिती,**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**महिला व बालकल्याण विभाग**
**जिल्हा परिषद,अमरावती**
**जिल्हा न्यायालयासमोर,कॅम्प अमरावती पिन-४४४६०१**
E-mail-dyceobalkalyan@gmail.com **दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६१९३४**

जा.क्र.जिप /मबाक/ मक / १६१६ /२०१६ दिनांकः- २७ जुन २०१६

**महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती सभा दिनांक २७/०५/२०१६ चे कार्यवृत्त**
**भाग-१.**

आज दिनांक २७/०५/२०१६ रोजी महिला व बालकल्याण समितीची सभा मा.सभापती, महिला व बाल कल्याण समिती जि.प. अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली सभापती म.बा.क.समिती यांचे कक्षात दुपारी १.०० वाजता सुरु झाली.

**आजच्या सभेला महिला व बालकल्याण समितीचे खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | सन्मा.श्रीमती वृषालीताई प्रकाशराव विद्ये | सभापती |
| २ | सन्मा. श्रीमती विद्याताई संजयराव तटटे | सदस्या |
| ३ | सन्मा. श्रीमती गिताताई संतोषराव चव्हाण | सदस्या |
| ४ | सन्मा. श्रीमती रंजनाताई बाबुरावजी उईके | सदस्या |
| ५ | सन्मा. श्रीमती संगीतताई प्रेमदास चक्रे | सदस्या |
| ६ | सन्मा.श्रीमती संगीतताई प्रविणराव सवाई | सदस्या |
| ७ | सन्मा.कु.सुषमाताई अशोक कलाने | सदस्या |
| ८ | सन्मा.श्रीमती पद्माताई अंबादास पंचाळे | सदस्या |
| ९ | सन्मा.श्रीमती शोभाताई सुखदेवराव इंगोले | सदस्या |
| १० | श्री.कैलास एन.घोडके | सदस्य सचिव |

आजची सभा मा. सभापती, महिला व बाल कल्याण समिती ,यांच्या निर्देशानुसार विषय पत्रिकेतील विषयाप्रमाणे सभेचे कामकाज करण्यांत आले.

**विषय क्रमांक १ :- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर करणे.**

मागील सभा दिनांक ३०/०४/२०१६ चे कार्यवृत्त श्री. कैलास एन.घोडके , उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) तथा सचिव ,महिला व बालकल्याण समिती यांनी सभेपुढे वाचुन दाखविले. त्यावर साधक बाधक चर्चा होवुन कार्यवृत्त सर्वानुमते मंजुर करण्यांत आले.

**विषय क्रमांक २ :- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**विषय क्रमांक ३ :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनाचा आढावा घेणे.**

आजच्या सभेला उपस्थित असलेले बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी सेविका भरतीबाबत ,तसेच अंगणवाडी इमारत बांधकामाबाबतचा आढावा घेण्यांत आला.तसेच सन २०११-१२ , सन २०१२-१३ व सन२०१३-१४ मधील अजुनपर्यंत पुर्ण न झालेली अंगणवाडी इमारत बांधकामे त्वरीत पुर्ण करण्याबाबत सुचना दिल्यात. ज्या ठिकाणी अंगणवाडी केंद्राकरीता जागा उपलब्ध नाही त्या ठिकाणी तहसिलदार यांचेशी संपर्क करुन जागा प्राप्त करण्याबाबत सर्व बा.वि.प्र.अ.यांना सभेमध्ये सुचीत करण्यांत आले. तसेच प्रकल्पनिहाय अंगणवाडी पोषण आहार आरोग्य तपासणी ग्रेड-३ व ग्रेड-४ ची मुले, बालमृत्यू ,लसीकरण व कूटूंबकल्याण इत्यादी बाबतचा प्रगती अहवाल सभेपुढे वाचुन दाखवला .त्यावर सभेत उपयुक्त सूचना देवून समितीने समाधान व्यक्त केले.

**विषय क्रमांक-४ लेखा विषयक नोंदवहयाना स्विकृती घेणेबाबत.**

महिला व बाल कल्याण विभागातील लेखविषयक नोदवहया, किरकोळ रोकड वही, घनादेश नोदवही, बिल नोंदवही, खर्च नोंदवही, जंगम मालमत्ता नोंदवही, वाहन लॉगबुक, इतिहास पुस्तिका, स्थायी अग्रीम नोंदवही, दूरघ्वनीनोंद वही, जमानत ठेव नोंदवही अश्या प्रकारे १६ लेखा विषयक नोंदवहयाना मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव सभेमध्ये ठेवण्यात आला त्यावर महिला व बाल कल्याण समितीमध्ये साधक बाधक चर्चा होवून सर्वानुमते मंजूरात प्रदान करण्यात आली.

## मा.सभापती यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

**विषय क्रमांक -५ :- सन २०१६-१७ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ओ.टि.एस.पी. या योजनेमधुन अंगणवाडी इमारत बांधकाम करणेबाबत**

सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेमध्ये आदिवासीउपयोजने अंतर्गत ओ.टि.एस.पी. योजनेमध्ये अंगणवाडी बांधकाम करण्याकरीता रुपये ४०.०० लक्ष निधी मंजुर केलेला आहे.शासन निर्णय दिनांक २०.४.२०१२ नुसार प्रती अंगणवाडी इमारत बांधकामाकरीता खर्चाची जास्तीत जास्त मर्यादा रु.६.०० लक्ष आहे.त्यामुळे रु.४०.०० लाखामध्ये प्रती अंगणवाडी रु.६.०० लाख प्रमाणे एकुण ६ अंगणवाडी बांधकाम होवु शकतात करीता गांवाची निवड करुन ६ अंगणवाडी बांधकाम प्रस्तावित करण्याबाबत सभेमध्ये सर्वानुमते यादीला मंजुरात देण्यात येवुन सदर ठरावाला प्रशासकीय मान्यता तसेच मालमत्ता संपादन करण्यास्तव ठराव जि.प.सभेसमोर ठेवण्याबाबत सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक-६ सांसद दत्तक ग्राम योजना अंतर्गत अंगणवाडी दुरुस्ती कामांना प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

भातकुली व नांदगांव खंडेश्वर या तालुक्यातील खालील आठ गांवे सांसद दत्तक योजनेमध्ये समाविष्ठ आहेत.सदर्हु गावामधील अंगणवाडी केंद्रांच्या इमारती दुरुस्ती करणे आवश्यक आहे.तरी खालील प्रमाणे अंगणवाडी दुरुस्ती कामांना प्रशासकीय मंजुरी तथा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

१) अंगणवाडी दुरुस्ती करणे निरसाना-अंतर्गत दुरुस्ती,आवार भिंत,इतर सुविधा रु.३.०० लक्ष
२) अंगणवाडी दुरुस्ती करण खिरसान- छप्पर दुरुस्ती,प्लुरिंग,दारे व खिडक्या रु.३.०० लक्ष
३) अंगणवाडी दुरुस्ती करणे टिमटाळा ङ छप्पर बदलविणे,खिडक्या,सज्जादुरुस्ती,दरवाजा,छपाई रु.३.००
४) अंगणवाडी दुरुस्ती करणे जनुना- छप्पर बदलणे,खिडक्या,सज्जादुरुस्ती,दरवाजा छपाई रु.३.०० लक्ष
५) अंगणवाडी दुरुस्ती करणे नांदेडा- छप्पर बदलणे,खिडक्या,सज्जादुरुस्ती,दरवाजा छपाई रु.२.५० लक्ष
६) अंगणवाडी दुरुस्ती करणे जसापुर- छप्पर बदलणे,खिडक्या,सज्जादुरुस्ती,दरवाजा छपाई रु.२.०० लक्ष
७) अंगणवाडी दुरुस्ती करणे ऋणमोचन- छप्पर बदलणे,खिडक्या,सज्जादुरुस्ती,दरवाजा छपाई रु.२.८० लक्ष

**ठराव :- सदर विषयावर साधक - बाधक चर्चा होवुन सदर कामांना निधी उपलब्धतेच्या अधिन राहुन महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए२०१२/प्रक्र६८०/वित्त९मंत्रालय मुंबई दिनांक १९ मार्च २०१२ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील नियम ९९ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील कलम ४ खालील परिशिष्ठ दोन मधील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या शक्तीची प्रक्रांती अन्वये समितीला दिलेल्या अधिकारानुसार वरील प्रमाणे अंगणवाडी इमारत किरकोळ दुरुस्तीच्या कामांना प्रशासकिय मंजुरात देण्यात येत असुन ही सभा सर्वानुमते मंजुरात प्रदान करीत आहे.**

**विषय क्रमांक-७ :- सन २०१४-१५ मध्ये राबविण्यात आलेल्या शिवणकाम व ड्रेस फॅशन डिझायनिगं प्रशिक्षणाबाबत तक्रारी प्राप्त झाल्याबाबत. श्री.बहुउदेशिय संस्था रहाटगांव अमरावती या संस्थेचे सचिव श्री.दातेराव यांचे वर कारवाई करुन संबंधित संस्था काळया यादीमध्ये टाकण्याबाबत.**

सन २०१४-१५ मध्ये शिवणकाम व ड्रेस फॅशन डिझायनिगं प्रशिक्षण घेण्यात आलेले होते.सदर प्रशिक्षण श्री.बहुउदेशिय संस्था रहाटगांव अमरावती या संस्थेमार्फत ग्रामीण लाभार्थ्यांना लाभ देणे प्रस्तावित होते.त्यानुसार सदर संस्थे अंतर्गत जिल्हयात १८ सेंटर लावण्यात आले होते. संबंधित संस्थेने १८ सेंटरच्या संचालिका यांचे कडुन प्रशिक्षण राबवुन घेवुन संबंधित सेटरच्या ब-याच संचालिका यांना प्रशिक्षणाचा मोबदल दिला नाही.व लाभार्थी प्रमाणपत्र सुध्दा वितरीत केलेले नाही.याबाबत या कार्यालयाला ब-याच प्रमाणात तक्रारी उपलब्ध झाल्यानुसार संबंधित संस्थेविरुध्द व संस्थेचे सचिव श्री.आनंद दातेराव यांच्यावर योग्यती कारवाई करण्याबाबत सदर विषय सभेसमोर ठेवण्यात येत आहे.

**ठराव :- सदर विषयावर साधक - बाधक चर्चा होवुन सदर संबंधित संस्था काळया यादीत टाकण्यात येत असुन सदर संस्थेचा प्रस्ताव शासन कडे पाठविण्याबाबत ही सभा मंजुरात देत आहे.तसेच १८ सेंटरचे संचालिका व सदर सेंटर वरील प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्याचे प्रमाणपत्र जोपर्यंत विद्यार्थ्यांना प्राप्त होत नाही. व संचालिका यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा मोबदला त्यांना संबंधित संस्थेकडुन प्राप्त होत नाही.तो पर्यंत श्री.बहुउदेशिय संस्था रहाटगांव अमरावती या संस्थेचे सन २०१४-१५ चा १०% लाभार्थी हिस्सा व सुरक्षा ठेव गोठविण्याबाबत ही सभा सर्वानुमते मंजुरात देत आहे. तसेच संबंधित संस्थेचे सचिव यांचे विरुध्द ४२० चा गुन्हा दाखल करण्याबाबत अनुमती देण्यात येत आहे.**

विषय पत्रिकेवरील विषय संपल्यामुळे मा.अध्यक्षाचेवतीने सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
**सचिव,तथा**
**उप मुख्यकार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद अमरावती**

स्वा/-
**सभापती,**
**महिला व बालकल्याण समिती,**
**जिल्हा परिषद, अमरावती**

# महिला व बालकल्याण विभाग
## जिल्हा परिषद,अमरावती
जिल्हा न्यायालयासमोर,कॅम्प अमरावती पिन-४४४६०१
E-mail-dyceobalkalyan@gmail.com दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६१९३४


जा.क्र.जिप /मबाक/ मक / १७७२ /२०१६ दिनांक:- १५जुलै २०१६

**महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती सभा दिनांक २७/०६/२०१६ चे कार्यवृत्त भाग-१.**

आज दिनांक २७/०६/२०१६ रोजी महिला व बालकल्याण समितीची सभा मा.सभापती, महिला व बाल कल्याण समिती जि.प. अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली सभापती म.बा.क.समिती यांचे कक्षात दुपारी १.०० वाजता सुरु झाली.

**आजच्या सभेला महिला व बालकल्याण समितीचे खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | सन्मा.श्रीमती वृषालीताई प्रकाशराव विद्ये | सभापती |
| २ | सन्मा. श्रीमती विद्याताई संजयराव तटटे | सदस्या |
| ३ | सन्मा. कु. सुषमाताई अशोकराव कलाने | सदस्या |
| ४ | सन्मा. श्रीमती गिताताई संतोषराव चव्हाण | सदस्या |
| ५ | सन्मा. श्रीमती रंजनाताई बाबुरावजी उईके | सदस्या |
| ६ | सन्मा. श्रीमती संगीताताई प्रेमदास चक्रे | सदस्या |
| ७ | सन्मा.श्रीमती संगीताताई प्रविणराव सवाई | सदस्या |
| ८ | सन्मा. श्रीमती शोभाताई सुखदेवराव इंगोले | सदस्या |
| ९ | सन्मा.श्रीमती पद्‌माताई अंबादास पंचाळे | सदस्या |
| १० | श्री कैलास एन.घोडके | सदस्य सचिव |

आजची सभा मा. सभापती, महिला व बाल कल्याण समिती ,यांच्या निर्देशानुसार विषय पत्रिकेतील विषयाप्रमाणे सभेचे कामकाज करण्यांत आले.

**विषय क्रमांक १ :- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर करणे.**

मागील सभा दिनांक २७/०५/२०१५ चे कार्यवृत्त श्री. कैलास एन.घोडके , उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) तथा सचिव ,महिला व बालकल्याण समिती यांनी सभेपुढे वाचुन दाखविले. त्यावर साधक बाधक चर्चा होवुन कार्यवृत्त सर्वानुमते मंजुर करण्यांत आले.

**विषय क्रमांक २ :- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

शासकीय परिपत्रक उपलब्ध नसल्यामुळे सभेत ठेवण्यात आले नाही.

**विषय क्रमांक ३ :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनाचा आढावा घेणे.**

आजच्या सभेला उपस्थित असलेले बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी सेविका भरतीबाबत ,तसेच अंगणवाडी इमारत बांधकामाबाबतचा आढावा घेण्यांत आला.तसेच सन २०११-१२ , सन २०१२-१३ व सन२०१३-१४ मधील अजुनपर्यंत पुर्ण न झालेली अंगणवाडी इमारत बांधकामे त्वरीत पुर्ण करण्याबाबत सुचना दिल्यात. ज्या ठिकाणी अंगणवाडी केंद्राकरीता जागा उपलब्ध नाही त्या ठिकाणी तहसिलदार यांचेशी संपर्क करुन जागा प्राप्त करण्याबाबत सर्व बा.वि.प्र.अ.यांना सभेमध्ये सुचीत करण्यांत आले. तसेच प्रकल्पनिहाय अंगणवाडी पोषण आहार आरोग्य तपासणी मध्यम कुपोषित,तीव्र कुपोषित मुले, बालमृत्यू ,लसीकरण व कूटूंबकल्याण इत्यादी बाबतचा प्रगती अहवाल सभेपुढे वाचुन दाखवला .त्यावर सभेत उपयुक्त सूचना देवून समितीने समाधान व्यक्त केले.

**विषय क्रंमाक ४ :- सन २०१५-१६ मधील वार्षीक प्रशासन अहवालास मंजुरी देणे.**

सन २०१५-१६ मधील महीला व बाल कल्याण विभागाचा वार्षीक प्रशासन अहवाल महीला ब बाल कल्याण समिती सभेची मंजुरी घेवुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती यांना सादर

करण्याकरीता सभेमध्ये सादर करण्यांत आला. त्यावर सभेमध्ये साधकबाधक चर्चा होवुन वार्षीक प्रशासन अहवालास मंजुरी देण्यांत आली.

**ठराव क्र.५ :- सन २०१६-१७ मध्ये शिवणकाम व ड्रेस फॅशन डिझाईन प्रशिक्षणा करीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्याकरीता अटी व शर्तीनां मंजुरात प्रदान करण्याबाबत.**

**१.सदर प्रशिक्षणाकरीता प्रस्ताव सादर करणारी संस्था ही शासकीय किंवा अशासकीय (शासनाकडुन मान्यता प्राप्त ) असणे आवश्यक आहे.त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ मुंबई यांची (शिवणकाम व फॅशन डिझायनिंग) मान्यता प्राप्त असणे आवश्यक आहे.**

**२.मागील ३ वर्षाचा ऑडीट रिपोर्ट तसेच अभ्यासक्रम कालावधी व प्रशिक्षण शुल्काची माहीती पत्रक संस्थेने देणे आवश्यक आहे. तालुकास्तरावर किंवा जवळपासचे मोठया गावामध्ये लाभार्थीना प्रशिक्षणाकरीता आवश्यक उप केंद्राची नांवे संच ,प्रशिक्षक इ.व्यवस्था असल्याबाबतचा तपशिल देणे बंधनकारक तसेच प्रत्येक प्रशिक्षणाथीनी शिवणकाम केलेला ड्रेस फॅशन नमुना या कार्यालयाला प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर प्रशिक्षणार्थीच्या संख्येनुसार सादर करणे बंधनकारक राहील.त्या शिवाय उर्वरीत ५०% पेमेंट अदा केले जाणार नाही.-**

**३.प्रशिक्षण देणा-या संस्थेला कमीत-कमी दोन वर्षाचा शासकीय कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.तसे प्रमाणपत्र सत्य प्रती स्वाक्षांकित करुन निविदे सोबत अपलोड करणे आवश्यक राहील तसे प्रमाणपत्र नसल्यास सदर कामाची कंत्राटदाराची निविदा रद्य करण्यात येईल.**

**४.प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर प्रशिक्षणाचा आदेश दिल्यानंतर देयकाची ५०% रक्कम प्रथम अदा करण्यांत येईल.तसेच संपुर्ण तालुक्यात योग्यरित्या प्रशिक्षण सुरु असल्याची शहानिशा झाल्यानंतर व लाभार्थीचे प्रशिक्षण पुर्ण केल्याबाबतचे प्रत्येक लाभार्थीचे प्रमाणपत्र या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच ५०% देयक अदा देण्यांत येईल.**

**५.लाभ मर्यादा शासन निर्णया नुसार प्रती प्रशिक्षणार्थी रु. ५०००/- पेक्षा जास्त देण्यांत येणार नाही.**

**६.शासन निर्णय दि.१०.३.२०११ नुसार प्रशिक्षण शुल्काच्या १०% रक्कम लाभार्थीने स्वत: भरावी.**

**७. प्रशिक्षणाचा कालावधी कमीत कमी ३ महिन्याचा राहील.**

**८.संस्थेला महिला व बालकल्याण विभागाकडुन प्रशिक्षणार्थीची यादी पुरविण्यांत येईल.**

**१०.प्रस्तावामध्ये देण्यांत येणा-या प्रशिक्षणाचे नांव , त्यासाठी लागणारा कालावधी तसेच प्रशिक्षणाचा पुर्ण खर्च नमुद करण्यांत यावा.**

**९.प्रशिक्षण मिळाल्याबाबतचे प्रशिक्षणार्थीचे स्वाक्षरीसह प्रमाणपत्र या कार्यालयामध्ये देणे बंधनकारक राहील.**

**१०.सदर लाभार्थीना प्रवेश दिल्यानंतर १ महिन्यापर्यंत जर लाभार्थी प्रशिक्षणाकरीता आलेला नसेल किंवा कोणतीही पुर्व सुचना दिलेली नसेल अश्या लाभार्थीची नांवे त्वरीत या कार्यालयास कळविण्याची जबाबदारी संबंधित केंद्राची राहील.तसेच दरमहा प्रशिक्षणार्थीची उपस्थिती संबधित संस्थेला या कार्यालयात पाठविणे बंधनकारक राहील.या कार्यालयात प्रशिक्षणार्थीचे हजेरी पट अप्राप्त असल्यास सदर संस्थेचे पेमेंट अदा करण्यात येणार नाही.**

**११.प्रस्तुत प्रशिक्षणामध्ये ३% अपंग प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.**

**१२.प्रस्ताव मंजुर केलेल्या संस्थेला वरील शर्ती व अटि मान्य असल्याबाबत मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ चे कलम ३४ मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे परिशिष्ट १ चे अनुछेद ६३ नुसार स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.**

**१३.निविदा मंजुर / नामंजुर तसेच रदद् करण्याबाबतचे संपुर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद,अमरावती यांना राहील.**

**१४.नोंदणीकृत मक्तेदारानी अधिकृत डी.एस.सी.(Digital Signature Certificate) प्राप्त करुन घेवुन http://Mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वत: नोंदणी करुन ई-निविदा पध्दतीनेच निविदा सादर करावी.**

**ठराव :- वरील विषयावर साधक-बाधक चर्चा होवुन सन २०१६-१७ मध्ये प्राप्त तरतुदी मधुन शिवणकाम व ड्रेस फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण राबविण्याकरीता वरील प्रमाणे अटी व शर्ती लागु करण्याबाबत ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.**

**विषय क्रमांक ६:- संगणक प्रशिक्षण (CCC) करीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्याकरीता अटी व शर्तीनां मंजुरात प्रदान करण्याबाबत.**

**१.निविदा सुचनेतील आवश्यक कागदपत्रे तसेच निविदा फी अपलोड न केल्यास संबंधित संस्थेची निविदा रदद् करण्यांत येईल.**

२.निविदा स्विकृत झाल्यानंतर एकुण रक्कमेच्या ३ टक्के रक्कमेचा डी.डी. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जि.प. अमरावती यांचे नांवे अमरावती देय असलेला सुरक्षाठेव म्हणुन सादर करावा लागेल.

**३. (CCC) हा संगणक प्रशिक्षण कार्यक्रम NIELIT (National Institute of Electronics & Information Technology) यांचेकडे हस्तांतरीत केलेला असल्याने निविदाधारक संस्था (NIELIT) अधिकृत केंद्र असणे आवश्यक आहे.तसेच तालुका स्तरावर किंवा जवळपासचे मोठया गांवामध्ये लाभार्थ्यांना प्रशिक्षणाकरीता आवश्यक व्यवस्था करावी लागेल.**

४.संगणक केंद्राला महिला व बालकल्याण विभागाकडुन प्रशिक्षणार्थीची यादी पुरविण्यांत येईल. त्यानुसार प्रशिक्षणार्थीची प्रशिक्षणाकरीता ऑनलाईन प्रवेश झाल्याबाबतची यादी या कार्यालयास सादर करावी लागेल.

५.प्रशिक्षणार्थ्याच्या सोईप्रमाणे व ज्या ठिकाणी प्रशिक्षण केद्र सुरु असने गरजेचे आहे त्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र सुरु करावे लागेल.

**६.संगणक प्रशिक्षणाचा कालावधी हा NIELIT ने ठरवुन दिला यवढा अथवा किमान ३ महिन्याचा राहील.**

**७.मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत आस्थापनेचे नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत अपलोड करणे आवश्यक राहील.**

**८.प्रशिक्षण देणा-या संस्थेला कमीत-कमी एक वर्षाचा (CCC) संगणक प्रशिक्षण दिल्याच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.तसे प्रमाणपत्र स्वाक्षांकित करुन निविदे सोबत अपलोड करणे आवश्यक राहील. प्रमाणपत्र नसल्यास सदर कामाची कंत्राटदाराची निविदा रद्य करण्यात येईल.**

**९. निविदेतील अटी व शर्ती नुसार जी कागदपत्रे आवश्यक आहेत.ती निविदेसोबतच अपलोड करावेत.कार्यालयात कोणतेही कागदपत्रे जमा करु नयेत. ती ग्राहय धरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

**१०.प्रस्ताव स्विकृत झाल्यावर संगणक प्रशिक्षणाचा आदेश दिल्यानंतर निविदाधारक संस्थेस आगाऊ रक्कम प्रथम अदा करण्यांत येईल.उर्वरीत सर्व रक्कम लाभार्थींचे प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केल्याबाबतचे प्रत्येक लाभार्थीचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केल्यानंतर देण्यांत येईल.**

**११**.या कार्यालयामधुन मंजुर लाभार्थींची यादी देण्यांत येईल त्यानुसार संबंधित लाभार्थीचा प्रवेश तालुक्यातील ज्या संगणक प्रशिक्षण सेंटरला केलेला आहे. त्याबाबत प्रत्येक लाभार्थीला संगणक प्रशिक्षण सेंटरचे नांव व पुर्ण पत्ता कळविण्याची जबाबदारी संबंधित केंद्राची राहील.

**१२**.सदर लाभार्थीना प्रवेश दिल्यानंतर १ महिन्यापर्यंत जर लाभार्थी प्रशिक्षणाकरीता आलेला नसेल किंवा कोणतीही पुर्व सुचना दिलेली नसेल अश्या लाभार्थींची नांवे त्वरीत या कार्यालयास कळविण्याची जबाबदारी संबंधित केंद्राची राहील.तसेच दरमहा प्रशिक्षणार्थीची उपस्थिती संबधित संस्थेला या कार्यालयात पाठविणे बंधनकारक राहील.या कार्यालयात प्रशिक्षणार्थीचे हजेरी पट अप्राप्त असल्यास सदर संस्थेचे पेमेंट अदा करण्यात येणार नाही.

**१३**.प्रस्तुत प्रशिक्षणामध्ये ३% अपंग प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.

**१८**.निविदा मंजुर / नामंजुर तसेच रदद् करण्याबाबतचे संपुर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद,अमरावती यांनी राखुन ठेवले आहेत.

**१४**.प्रस्ताव मंजुर केलेल्या संस्थेला वरील शर्ती व अटि मान्य असल्याबाबत मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ चे कलम ३४ मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे परिशिष्ट १ चे अनुछेद ६३ नुसार स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

**१५** .नोंदणीकृत मक्तेदारानी अधिकृत डी.एस.सी.(Digital Signature Certificate) प्राप्त करुन घेवुन http://Mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वत: नोंदणी करुन ई-निविदा पध्दतीनेच निविदा सादर करावी.

**ठराव :- वरील विषयावर साधक-बाधक चर्चा होवुन सन २०१६-१७ मध्ये प्राप्त तरतुदी मधुन संगणक (CCC) प्रशिक्षण राबविण्याकरीता वरील प्रमाणे अटी व शर्ती लागु करण्याबाबत ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.**

**विषय क्रमांक ६:- सन २०१६-१७ च्या प्राप्त अनुदानामधुन झिगंझाग पिको फॉल शिलाई मशीन खरेदी करीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी अटी व शर्तीनां मंजुरात प्रदान करण्याबाबत.**

सन २०१६-१७ च्या जिल्हा निधी /शासकीय निधी अनुदानामधुन झिंगझाग पिको फॉल शिलाई मशीन खालील प्रमाणे आकारमान व साईजची घेण्याबाबत समितीने ठरविले आहे.

House Hold Zigzag Pico Fall Sewing Machine Specification

| No | Description |
|---|---|
| १ | १) House Hold Zigzag Sewing Machine ISI marked IS - 15449<br>२) Machine Body Heavy Duty Casting Made,Weight More Than 14 kg Link Motion system for machine<br>३) Oscillating Open type half shuttle race for easy maintenance with Manufacturers name Embossed on the shuttle<br>४) Drop feed dog mechanism for free hand embroidery.<br>५) Reverse Stitch mechanism for strength to stretchable area.<br>६) Stitch length selector Knob Lever Type.<br>७) Stitch Pattern Selector Lever Sliding Type.<br>८) Thread tension Controller knob round dial type.<br>९) Bobbin Winding system Auto Trip with Adjusting Screw<br>१०) Sewing Speed 1000 to 1200 stitches per Minute (Max)<br>११) Pressure Adjuster Patchomatic, Stitch Length 6-30 Per 25 MM<br>१२) Slide Plate- Hinged type with manufacturers name embossed on the plate<br>१३) Manufacturers Should have its own name ISO-9001 Certified manufacturing Unit<br>१४) Manufacturers Should have its own name ISI Mark Certificate for Zigzag Sewing Machine Head<br>१५) Features-Straight Stitch, Picot, Fall, Zigzag, Embroidery,Zip Fixing Button Hole, Mending, Satin Stitch, Over edging, Lace fixing work.Patchwork, Monogramming.<br>१६) Heavy duty Mild Steel Stand Stand weight-13 kg Sewing Machine Table-Size 17.5x35.5 with drawer , Accessories-Bobbin-3, Screw driver Big-1, Small-1, Oil Bottle, Needle-2, DifferentPressure Foots-2 Nos, Scissor-1, |

१) अधिकृत पुरवठा दाराने निविदे सोबत पिको फॉल मशीन गट, टेबल व स्टॅन्ड उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याबाबतच्या प्राधिकार पत्राची (Authorization Letter) मुळ प्रत निविदा क्रमांका सहित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अमरावती यांचे नावे जोडणे आवश्यक आहे.

२) पिको फॉल मशीन गट,टेबल व स्टॅन्ड उत्पादक कंपनीचे लघु उघोजक प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.व त्या प्रमाणपत्रामध्ये मशीन गट,टेबल व स्टॅन्ड या बाबीचा समावेश असणे आवश्यक

३) पिको फॉल मशिन गट उत्पादकास पिको फॉल मशीन गट उत्पादन होत असलेल्या कारखान्या करिता मिळालेले वैध कालावधीचे आय एस ओ प्रमाणपत्र व पिको फॉल मशीन गटाचे आय एस आय मार्क प्रमाणपत्र आय एस १५४४९ निविदे सोबत जोडणे आवश्यक राहील.

४) पिको फॉल मशीन टेबल व स्टन्ड उत्पादक कंपनी एकच असणे आवश्यक

५) पिको फॉल मशिन टेबल व स्टॅन्ड उत्पादक कंपनीचे अद्यावत आय एस ओ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

६) पिको मशीन चा नमुना निविदा दाखल करावयाच्या अंतिम तारखेला २ दिवस अगोदर सादर करावा व तशी नमुना साहित्याची पोहोच निविदेच्या तांत्रिक लिफाफयामध्ये उपलोड करणे आवश्यक राहील.

**ठराव :- वरील विषयावर साधक-बाधक चर्चा होवुन सन २०१६-१७ मध्ये प्राप्त तरतुदी मधुन झिंगझाग पिको फॉल शिलाई मशीन वरील प्रमाणे साईज व आकारमाना नुसार खरेदी करण्यात यावी तसेच वरील प्रमाणे अटी व शर्ती निविदा प्रक्रिया राबविण्या करीता लागु करण्याबाबत ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.**

**विषय क्रमांक ७ :- सन २०१६-१७ च्या प्राप्त अनुदानामधुन लेडीज सायकल खरेदी करीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी अटी व शर्तीनां मंजुरात प्रदान करण्याबाबत.**

सन २०१६-१७ च्या जिल्हा निधी /शासकीय निधी अनुदानामधुन लेडीज सायकल खालील प्रमाणे आकारमान व साईजची घेण्याबाबत समितीने ठरविले आहे.

TECHNICAL SPECIFICATION FOR UNI GENDER RANGER CYCLE 26 FOR GIRLS

| | |
|---|---|
| RANGER CYCLE FRAME | **Mig weldfd Steel Frame with integrated Carrier Frame with 7 year Warranty** |
| FORK | **Uni Crown Mig Welded** |
| HANDLE | **Semi Raised Handle For Performance Riding With Soft Grips** |
| CHAIN COVER | **Steel Chain Cover** |
| BRAKES | **V Brake Alloy Lever & Friction Free Cable Casings For Effective Braking** |
| RIMS | **Aluminium Alloy Rims For Lighter Weight And Performance Riding** |
| PEDAL | **Moulded Anti Skid Body Reflectorised Pedals** |
| CRANK SET | **Single Chain Wheel** |
| COLOR | **Red/ Green/ Grey** |
| TIRE | **26x1.95 City Tread Pattern For Better Smooth Riding** |
| ISI MARK PART | **Tyre - IS - 2414/2005**<br>**Tube - IS - 2415/2004**<br>**Chain - IS - 2403/1991** |
| | **MANUFACTURER SHOULD BE STRICTLY**<br>**१) ISO14001:2004&**<br>**२) BS OHSAS -18001:2007 CERTIFIED Manufacturer For Manufacturing Of Above Cycly** |

१) सायकल उत्पादकाचे टायर,टयुब व चेन या ३ पार्टचे अद्यावत आय एस आय मार्क प्रमाणपत्र निविदेच्या तांत्रिक लिफाफयामध्ये जोडणे बंधनकारक राहील.

२) सायकल उत्पादकाचे आय एस ओ १४००१-२००४ व आय एस ओ १८००१-२००४ चे अद्यावत प्रमाणपत्र निविदेच्या तांत्रिक लिफाफयामध्ये जोडणे बंधनकारक राहील.

७) सायकल चा नमुना निविदा दाखल करावयाच्या अंतिम तारखेला २ दिवस अगोदर सादर करावा व तशी नमुना साहित्याची पोहोच निविदेच्या तांत्रिक लिफाफयामध्ये उपलोड करणे आवश्यक राहील.

**ठराव :- वरील विषयावर साधक-बाधक चर्चा होवुन सन २०१६-१७ मध्ये प्राप्त तरतुदी मधुन लेडीज सायकल वरील प्रमाणे साईज व आकारमाना नुसार खरेदी करण्यात यावी तसेच वरील प्रमाणे अटी व शर्ती निविदा प्रक्रिया राबविण्या करीता लागु करण्याबाबत ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.**

विषय पत्रिकेवरील विषय संपल्यामुळे मा.अध्यक्षाचेवतीने सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
**सचिव,तथा**
**उप मुख्यकार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद अमरावती**

स्वा/-
**सभापती,**
**महिला व बालकल्याण समिती,**
**जिल्हा परिषद, अमरावती**